Literacy for a Billion

Movie: Hastil tyache daat distil
Year: 2009

Song: Janm dila mansacha
Lyricist: Rutuja Fulkar

आ...
जन्म दिला माणसाचा
चंदनाचे दान
जन्म दिला माणसाचा
चंदनाचे दान
तुझ्या पायी उगाळीता
सरो देहभान
तुझ्या पायी उगाळीता
सरो देहभान

किती वारे पावसाळे
पेटते उन्हाळे
किती वारे पावसाळे
पेटते उन्हाळे
वाटेवरी पेरलेले
वाटेवरी पेरलेले
पाशवी निखारे
पोळलेला जन्म तरीही
रोज नवं गाणं
पोळलेला जन्म तरीही
रोज नवं गाणं
जन्म दिला माणसाचा
चंदनाचे दान
तुझ्या पायी उगाळीता
सरो देहभान

दोर तुझ्या हाती आम्ही
बोलक्या बाहुल्या
दोर तुझ्या हाती आम्ही
बोलक्या बाहुल्या
तरीही का भिवविती
मृत्यूच्या साऊल्या
तरीही का भिवविती
मृत्यूच्या साऊल्या
मनी आज कल्लोळाचे
यावे कसे भान
मनी आज कल्लोळाचे
यावे कसे भान
जन्म दिला माणसाचा
चंदनाचे दान
तुझ्या पायी उगाळीता
सरो देहभान

काय तुझ्या मनी सांग
कसे ओळखावे
ओंजळीत उरले श्वास
प्रेमाने जगावे
काय तुझ्या मनी सांग
कसे ओळखावे
ओंजळीत उरले श्वास
प्रेमाने जगावे
चराचरावर माझ्या
तुझे अधिष्ठान
चराचरावर माझ्या
तुझे अधिष्ठान
जन्म दिला माणसाचा
चंदनाने दान

जन्म दिला माणसाचा
चंदनाने दान
तुझ्या पायी उगाळीता
सरो देहभान

तुझ्या पायी उगाळीता
सरो देहभान
तुझ्या पायी उगाळीता
सरो देहभान

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*